आरोपी व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, साक्षीदार साक्षकरिता सकाळी ११.०० वाजले पासून हजर. सबब फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ मधील प्रोव्हीझो (क) तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३४६(२) मधील प्रोव्हीझो (ड) नुसार साक्षीदाराची साक्ष पुढील प्रमाणे नोंदविणेत येत आहे.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

**सं.फौ.ख. क्र. ६४३/२०२२**
**सरकार वि. मंगेश पवार**
**नि.क्र. ८ खाली**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करते ते खालीलप्रमाणे की,**

नाव :- संजय प्रभु माटे

वय :- ४० वर्षे, व्यवसाय-फोटोग्राफर

राहणार – आसले पिराची वाडी ता वाई जि सातारा

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ.ए.ए.जमदाडे यांचेमार्फत सुरु :-**

दि. १४/०६/२०२२ रोजी मला भुईंज पोलीस ठाण्यात बोलाविले होते. तेथून मी दारु छापा कार्यवाही कामी पांडे गावच्या मालदारे वस्ती येथे गेलो होतो. आम्ही त्याकरीता ओझर्डे गावातून दुचाकीने गेलो होतो मी प्रशांत शिंदे यांच्या दुचाकीवर मागे बसून तेथे गेलो होतो तसेच आमच्या सह असलेला भालचंद्र चव्हाण हा रविराज वर्णेकर यांच्या दुचाकीवर मागे बसून तेथे आला होतो. तेथे सायंकाळी ६.३० च्या सुमारास कार्यवाही करण्यात आली होती. त्यावेळी तेथे एका पांढ-या पिशवीत दारुच्या बाटल्या होत्या. तसेच तो ऐवज आरोपी मंगेशच्या ताब्यात होता. आरोपीस पोलीसांनी त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव मंगेश पवार असे सांगितले. त्यानंतर आम्हा पंचासमक्ष पोलीसांनी सदरील पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये देशी दारु संत्राच्या एकूण २० बाटल्या आढळून आल्या होत्या. तो ऐवज पोलिसांनी पंचनामा कार्यवाही करुन आमच्या समक्ष हस्तगत केला होता. त्याकरिता पोलीसांनी त्यांच्यासह आणलेल्या लॅपटॉपचा वापर केला होता. आता मला सदरील **पंचनामा** दाखवण्यात आला तो तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे तो **निशाणी क्र ९** वर आहे. मी आरोपीस ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पूर्ण

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. शेख**

**आरोपी व त्यांच्या विधीज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. करिता उलटतपास नाही.**

**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.02.24 12:14:30 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :-२१/०२/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई